# शिवकृपा पतपेढी राज्यात आदर्श : धर्माधिकारी

## चिंचवडमध्ये एक हजार कोटींचा संमिश्र व्यवसाय पूर्ण केल्याच्या निमित्ताने आनंद सोहळा

**कोरेगाव, ता. ५ :** निकोप सहकार जोपासत अर्थकारणास अध्यात्माची जोड देणारी शिवकृपा पतपेढी ही राज्यात समाजाभिमुख, आदर्श पतसंस्था ठरल्याचे गौरवोद्गार पुण्याच्या चाणक्य मंडलचे संचालक अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

शिवकृपा पतपेढीने एक हजार कोटींचा संमिश्र व्यवसाय पूर्ण केल्यानिमित्त चिंचवड (पुणे) येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजित आनंद सोहळ्यात श्री. धर्माधिकारी बोलत होते. सोलापूर वस्त्रोद्योग विभागाचे प्रादेशिक उपसंचालक अशोक भांडवलकर, 'शिवकृपा'चे अध्यक्ष अविनाश भोसले, उपाध्यक्ष हणमंत गायकवाड, मानद सचिव पंढरीनाथ भोसले, संस्थापक संचालक कृष्णा शेलार, माजी अध्यक्ष चंद्रकांत वंजारी आदींची उपस्थिती होती. श्री. धर्माधिकारी म्हणाले, "संस्थेतील सेवकांची विनम्रता, कामाची पद्धत ही राज्यातील सहकाराला मार्गदर्शक असून, संस्थेच्या कामातच वेगळा आनंद मानून हे सर्व जण काम करत आहेत." संस्थेने इतरांना मार्गदर्शन करावे व सहकारातील इतर पतसंस्थांनी 'शिवकृपा'चा आदर्श दृष्टिक्षेपात ठेवून वाटचाल करावी, असे आवाहनही त्यांनी केले.




**चिंचवड :** 'शिवकृपा'च्या एक हजार कोटी संमिश्र व्यवसाय संकल्पपूर्तीच्या नामफलकाचे अनावरण करताना अविनाश धर्माधिकारी. त्या वेळी अविनाश भोसले, हणमंत गायकवाड, पंढरीनाथ भोसले, कृष्णा शेलार, चंद्रकांत वंजारी, पांडुरंग घाडगे आदी.

संस्थेचे संस्थापक, संचालक चंद्रकांत वंजारी यांनी प्रास्ताविकात गेल्या २८ वर्षांत जे झाले नाही, ते सर्वांच्या योगदानाने अवघ्या पाच वर्षांत निर्माण करण्यात आम्ही यशस्वी ठरल्याचे सांगितले. अशोक भांडवलकर म्हणाले, "शिवकृपाचे युवा नेतृत्व पाहिल्यानंतर ही संस्था 'हायटेक' होत चालल्याचे अभिमानाने नमूद करावे लागेल." संस्थेचे अध्यक्ष अविनाश भोसले यांनी येत्या काही दिवसांत 'शिवकृपा'च्या आठ शाखा जनसेवेत रुजू होत असल्याची घोषणा करून त्यासाठी नव्या नियुक्त्याही जाहीर केल्या. या वेळी श्री. शेलार, माजी अध्यक्ष वसंतराव चव्हाण, भीमराव बोराडे, बाळासाहेब मोहिते, सखाराम संकपाळ, जयवंत खामकर, सोपान बोराडे, अशोक तुपे, बबन काटे, कर्मचारी व ठेव संकलन प्रतिनिधींनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी मुंबई सहकार बोर्डावर संचालकपदी निवड झाल्याबद्दल श्री. शेलार, श्री. वंजारी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचा प्रारंभ संतोष देशमुख यांनी स्वागत व ओंकार आराधनेने केला. मुख्य कार्यकारी अधिकारी पांडुरंग घाडगे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. माजी संचालक शिवाजीराव ऐवळे, वरिष्ठ व्यवस्थापक संदीप जाधव यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे उपाध्यक्ष हणमंत गायकवाड यांनी आभार मानले. या वेळी 'शिवकृपा'च्या ५५ शाखांचे कर्मचारी, ठेव संकलन प्रतिनिधी उपस्थित होते. समारंभाच्या यशस्वितेसाठी 'शिवकृपा'च्या पुणे विभागाचे विभागीय अधिकारी संपत तुपे यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.